“प्रचार, प्रसिध्दी, व प्रशिक्षण” या योजनेसाठी सन २०१५-१६ करिता निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- अंदाज-२०१५/प्र.क्र.८५/फ-११
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १६ जानेवारी, २०१६.

वाचा - १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : -साववि-२०१५/प्र.क्र. ५७/फ-११ दिनांक १४.०७.२०१५.
२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक : -पूरक-२०१५/प्र.क्र. २०१/अर्थ-३ दिनांक १.०१.२०१६.
३) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक : -अर्थसं-२०१५/प्र.क्र. ९५/अर्थ-३ दिनांक १२.०१.२०१६.

प्रस्तावना -

सामाजिक वनीकरण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या निरनिराळया योजनांची जनतेस माहिती व्हावी. वृक्ष लागवड, वृक्षसंवर्धन, पर्यावरण रक्षण, प्रदुषण नियंत्रण याबाबत त्यांच्यामध्ये जागृती निर्माण होवून त्यांनी त्यांच्या खाजगी, पडीक क्षेत्रात जास्तीत जास्त प्रमाणात वृक्षांची लागवड करावी या दृष्टीकोनातून सामाजिक वनीकरण विभागामार्फत प्रचार, प्रसार व प्रसिध्दी हे कार्यक्रम राबविण्यात येतात. या कार्यक्रमांतर्गत जिल्हा स्तरावर, राज्य स्तरावर महाविद्यालयीन, माध्यमिक व प्राथमिक अशा तीन गटांत निबंध, चित्रकला, छायाचित्र तसेच वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करुन अशा स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांत, जनतेत वृक्ष लागवडीमध्ये सहभाग वाढविण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येतात. या व्यतिरिक्त निरनिराळया कृषि प्रदर्शनांमध्ये सामाजिक वनीकरणाचा सहभाग, ग्रामसभा आयोजन याद्वारे जनतेमध्ये वृक्ष लागवडीबाबत जनजागृती करण्यात येते. तसेच सामाजिक वनीकरण यंत्रणेच्या विविध योजना लोकांपर्यन्त पोहोचविण्यासाठी व प्रभावीपणे राबविणेसाठी व लोकांना योजनांची तांत्रिक माहिती उपलब्ध व्हावी या हेतूने प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सन २०१५-१६ करिता रु. ५००.०० लक्ष इतका अतिरिक्त नियतव्यय हिवाळी अधिवेशनात पूरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आला आहे. संदर्भ क्रमांक ३ वरील परिपत्रकान्वये एकूण वार्षिक तरतूदीच्या ७० % ही पूर्वीची मर्यादा तशीच ठेवण्यात आली आहे. तसेच डिसेंबर, २०१५ मधील पूरक मागण्यांचा निधी वितरणाची मर्यादा ५०% इतकी ठेवण्यात आली आहे. त्यामुळे सन २०१५-१६ करिता या योजनेअंतर्गत पूरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या ५००.०० लक्ष इतक्या निधीपैकी रु. २५०.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

सामाजिक वनीकरण विभागामार्फत प्रचार, प्रसार व प्रसिध्दी हा कार्यक्रम राबविण्यात येत असून त्याबाबत असलेली “प्रचार, प्रसार व प्रसिध्दी” या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २०१५-१६ करिता रु. ५००.०० लक्ष इतका अतिरिक्त नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे. या निधी पैकी

५० % निधी म्हणजे रू. २५०.०० लक्ष सन २०१५-१६ साठी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी साठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. मंजूर निधीचे जिल्हानिहाय वाटप करण्यास महासंचालक,सामाजिक वनीकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. या योजनेतंर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

३. जिल्हानिहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर आणि महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत व्हावे.

४. सदर योजनेतंर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१५-१६ मध्ये मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून खर्ची टाकण्यात यावा.
"मागणी क्र.सी-७, २४०६, वनीकरण व वन्यजीवन, (योजनांतर्गत) ०१ वनीकरण, ००३, शिक्षण व प्रशिक्षण (००) (०३) प्रचार, प्रसिध्दी व प्रशिक्षण - २६, जाहिरात व प्रसिध्दी (२४०६ ८७८९)".

५. सदर शासन निर्णय संदर्भ क्र. ३ येथे नमूद वित्त विभागाचे परिपत्रक क्र. वित्त विभाग क्रमांक : -अर्थसं-२०१५/प्र.क्र. ९५/अर्थ-३, दिनांक १२.०१.२०१६ मधील सूचनांनुसार प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारांन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११६१७०७२६१७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dattatraye Laxman Thorat

Digitally signed by Dattatraye Laxman Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dattatraye Laxman Thorat
Date: 2016.01.16 17:08:19 +05'30'

(डी. एल. थोरात)
सह सचिव, (वने)

प्रत,

१. मा. मुख्य सचिव.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग.
४. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग.
५. प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय

६. सचिव, (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय.
७. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग.
८. सचिव (वने), महसूल व वन विभाग.
९. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
१०.प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),नागपूर.
११.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१२. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. मुख्य वनसंरक्षक व उप महासंचालक, सामाजिक वनीकरण वृत्त, कोकण ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर .
१४. सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, (सर्व जिल्हे)
१५. महालेखापाल, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
१६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई -४०० ०३२.
१८.निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
१९. वित्त विभाग, व्यय-०९, अर्थसंकल्प- ०६ मंत्रालय, मुंबई-३२
२०. कार्यासन अधिकारी, फ-२,फ-७,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२१. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२२.सह सचिव/उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२३.निवडनस्ती/फ-११.